—मास्टर वाटवे व आवडत्या गायक-गायिकांनीं गाइलेलीं—

# गोड गोड भावगीतें

नो. १०५३७ काव्य

( भाग पहिला )

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ८२५३

★

संपादक :- ग. का. रायकर

सं. नं. ८०८
१०५३७

★

जयहिंद प्रकाशन
ठाकुरद्वार, झावबाची वाडी मुंबई २

REFBK-0007253
REFBK-0007253



✲ मूल्य आठ आणे ✲ ✲ : ३ : ✲

जयहिंद प्रकाशन
ठाकुरद्वार: झावबाची वाडी: मुंबई २

## भावगीतें !

ऐकण्याला रसिकांच्या झुंडीच्या झुंडी लोटतात! भावगीताइतका दुसरा कोणताही काव्यप्रकार लवकर लोकप्रिय होत नाहीं. एकाद्या क्षणास कवीला आलेल्या सुंदर कल्पनेचें किंवा एकाद्या क्षणांत प्राप्त झालेल्या भावनेचें स्पष्टीकरण ह्या भावगीतांत केलेलें असतें. आधुनिक कवींचें पुष्कळसें काव्य भावगीतांत आहे. कांहीं आधुनिक कवींचीं उत्कृष्ट भावगीतें रेकॉर्ड झालेलीं असून तीं फार लोकप्रिय झालेलीं आहेत. आधुनिक कवींच्या भावगीतांचा प्रातिनिधिक संग्रह आम्ही प्रसिद्ध करणार आहों! पण तूर्त जीं भावगीतें रसिकांना फार आवडलीं आहेत त्यांचा हा छोटा संग्रह प्रसिद्ध करीत आहों. रसिकांना हा छोटा संग्रह आवडला तर मोठा संग्रह लौकरच प्रकाशित करण्याला उमेद येईल.

नामवंत कवींनीं आपलीं गोड भावगीतें घेण्याला परवानगी दिली, 'हिज मास्टर्स व्हॉईस' नें व 'कोलंबिया ग्रामोफोन कं.' नें कांहीं फोटो व मुद्रा दिल्या, श्री. जी. एन्. जोशी, श्री. वि. बा. पावले, श्री. रोहिदास पैंगणकर, श्री. बाबुराव गोखले, श्री. स. अ. शुक्ल व श्री. राजा बढे ह्यांनीं आपुलकीनें बहुमोल सहाय्य केलें, अन् कलावंत मुळगांवकर ह्यांनीं सुंदर सजावट केली ह्याबद्दल मला सदैव त्यांची आठवण राहील! त्यांना धन्यवाद!

रसिकांच्या अलोट प्रेमामुळें पहिली आवृत्ति हांहां म्हणतां संपून गेली; म्हणून ही नवीन सुधारलेली आवृत्ति सादर करीत आहों. —ग. का. रायकर


| मुद्रक | प्रकाशक | प्रथमावृत्ति |
|---|---|---|
| ज. दि. देसाई | ग. का. रायकर | गोकुळअष्टमी १९४९ |
| राष्ट्रवैभव प्रेस | झावबाची वाडी | द्वितियावृत्ति |
| गिरगांव : मुंबई | ठाकुरद्वार : मुंबई २ | अनंतचतुर्दशी १९४९ |

# गीतमाला


(१) कवि बाबूराव गोखले : पुणें

१ नाखवा वल्हव वल्हव ५
२ माहेरचा समोर गांव १०
३ तुझं माझं प्रेम जुळलं २३
४ नीरांजन पडलें तबकांत ३२
५ प्रीत तुझी माझी ३४
६ कमरेला पदर खोंचुन ३५
७ वारा फोफावला ३८
८ भावगीत ऐकिलें ४६

(२) कवि ग. दि. माडगूळकर

९ सांवळाच रंग तुझा ६
१० नका गडे माझ्याकडे २५
११ रानांत सांग कानांत २६
१२ घनश्याम नयनीं आला २७
१३ गेला दर्यापार २९
१४ आली रे आली ३६
१५ फांद्यावरी बांधिले ग ३७
१६ गोकुळींचा राजा ३९
१७ कुणि आलं कुणि आलं ४१
१८ माझ्याजवळी बसा ४१

(३) कवि स. अ. शुक्ल : मुंबई

१९ बोल सख्या मधु बोल ७
२० आंब्रेवनांत जाऊया २८
२१ कशि बाई दुनिया डोले ४२
२२ छेडुनीयां हृदयवीणा ४३
२३ लपंडाव मांडिला ४३
२४ तुझ्या दारिं आलें होते ४५

(४) कवि मनमोहन नातू : पुणें

२५ हळू हळू बोल कृष्णा ८
२६ उंबरठ्यावर माप ठेविलें २१
२७ राधे तुझा सैल अंबडा ३०
२८ वेणी घाला माझी ३१
२९ मैत्रिणींनों सांगू नका ३३
३० बापूजींची प्राणज्योती ४८

(५) कवि राजा बढे : मुंबई

३१ कोण ग उभें तुझ्या अंगणीं ९
३२ सखये प्रेमपत्र पहिलें ४०

(६) कवि ग. ल. ठोकळ : पुणें

३३ किती बघाची वाट १२
३४ गळ्याची शपथ २२

(७) कवयित्री सौ. **संजीवनी मराठे**

३५ आला स्वप्नांचा मधुमास ११

(८) कवि **नामदेव व्हटकर**

३६ भर दुपारच्या ग प्रहरीं १३

(९) कवि **बा. भ. बोरकर**

३७ नांव तिकडचं घेऊं ग १७

(१०) कवि **श्रीनिवास खारकर**

३८ अग पाटलाच्या पोरी १५

(११) कवयित्री **शांता शेळके**

३९ मध्यरात्रिला पडे तिच्या १६

(१२) कवि **मा. ग. पातकर**

४० अंतरींच्या अपुऱ्या आशा १८

(१३) कवि डॉ. **वामनराव निपुणगे**

४१ शेजारच्या घरांत १४

(१४) कवि **जी. के. दातार**

४२ कां उदास बघशी २०

(१५) कवि **दत्ता डावजेकर**

४३ तुज स्वप्नीं पाहिलें रे १९

४४ माझ्या कानांत नको कांहीं ४७

(१६) कवि **प्रभाकर जोशी** : मुंबई

४५ निलांगणीं या हांसत बघ आला ४७

★

## गोड गोड भावगीतें : भाग २ रा

पहिल्या भागाप्रमाणेंच या दुसऱ्या भागांतही नामवंत कवींचीं व प्रसिद्ध गायक-गायिका यांनीं गाइलेलीं भावगीतें दिलेलीं आहेत. प्रत्येक गाण्याला विषयानुरूप चित्र व मुखपृष्ठावर नवीन सुंदर तिरंगी चित्र आहे. पृष्ठें ४८ : जाड कव्हर : मूल्य ८ आणे.





गायक : जी. जे. वाटवे ☼ कवि : बाबुराव गोखले

# नाखवा

नाखवा वल्हव वल्हव
झप झप मचवा किनारीं नाखवा । वल्हव वल्हव ॥ धृ० ॥
आलों खाडीवर मासं धरायला दूर
सखी कांठावर मला पगायला चूर
भरती सुकतीनं खाडिचा भरून आला ऊर
तिच्या न् माझ्या मनामंदी सोसाटलं काहूर
धावंऽल मासा जाळ्यामंदी तुझ्या
तुटंऽल तिळतिळ मनामंदी माझ्या
सुकंऽल मासा जळाविना
झुरंऽन मीहि तिच्याविना
अंबर लुकलुकलं चुक्तं ताऱ्यानं
बंदर लखलखलं समदं बिजलीनं
तांडेल मी हकडं होडी ती तकडं



☼ ☼ ☼

पहिला पाळणा, सीता-स्वयंवर, जिवाचा सखा इ. बोलपटांतील गाणीं महाराष्ट्राचे लोकशाहीर श्री. ग. दि. माडगूळकर ह्यांचीं असून त्यांचीं कितीतरी भावगीतें फार लोकप्रिय झालीं आहेत. रेडियोवर तर ह्यांचें नांव सारखें गाजत असतें. पद्यरचना हृदयंगम व भावपूर्ण असते.

☼ ☼ ☼

## सांवळाच रंग तुझा

सांवळाच रंग तुझा, पावसाळीं नभापरी
आणि नजरेंत तुझ्या, वीज खेळते नाचरी
सांवळाच रंग तुझा, चंदनाच्या वनापरी
आणि नजरेंत तुझ्या, नाग खेळती विषारी

सांवळाच रंग तुझा, गोकुळिंच्या कृष्णापरी
आणि नजरेंत तुझ्या, नित्य नांदते पावरी
सांवळाच रंग तुझा, माझ्या मनीं झांकळतो
आणि नजरेचा चंद्र, पाहूं केव्हां उगवतो

सांवळाच रंग तुझा, करी जीवा बेचैन
आणि नजरेंत तुझ्या, झालों गडी बंदीवान

[ गायिका : माणिक दादरकर ]

★

बोलपटांतील व ग्रामोफोनवरील गाण्याच्या क्षेत्रांत, आज तरी **शुक्ल कवि** पहिले आहेत. सिंहाचा छावा, सत्याग्रही, सौभाग्यलक्ष्मी इ. गाजलेलीं नाटकें व भक्तीचा




मळा, गोराकुंभार, नारद–नारदी इ. बोलपटकथा ह्यांच्या भक्तिरसप्रधान लेखणींतून उतरलेल्या आहेत. ह्यांचीं तीनशेंवर गीतें ध्वनिमुद्रित झालेलीं आहेत.

## बोल सख्या मधु बोल !

बोल सख्या, मधु बोल रे,
धरूं नको अबोला;
बोल सख्या, मधु बोल !
तव मुरलीचा बोल घुमला
विमल हृदयिं बघ खोल रे !
बावरी राधा; विकल मनाचा
सांवरी सुटला तोल रे !
वाजिव सदया, एकदां बांसरी
घेईं जिवाचें मोल रे !
विश्व उमललें, जीवन फुललें
फुलें जादु अनमोल रे !
हंसति अनन्त नभान्तरिं तारे
नाचति किती ग्रह–गोल रे !
जिवलगा कन्हैया,
बोल गडे मधु बोल !

[ गायिका : **सौ. संजीवनी मराठे** ]

२०५३८



★

मनमोहन कवींना प्रथमपासूनच विडंबन काव्यें करण्याची संवय आहे. त्यांच्या काव्यांतील उपमा, वाचकाला एकदम खडा लागावा तशा बोंचतात; पण त्यांतील कल्पना रम्य, भव्य आणि उदात्त असतात. ह्यांच्या गीताच्या पहिल्या दोन ओळी फारच आकर्षक असतात. त्यामुळें त्या तोंडांत साखऱ्या घोळत रहातात.

★

## हळू हळू बोल कृष्णा !

हळू हळू बोल कृष्णा, हळू हळू बोल ॥ धृ० ॥
सासू दळिते पलीकडे तिला लागेल कानोसा
नणंद बसली माजघरीं तिला लागेल कानोसा
येतिल केव्हां माडिवरी नाहीं यांचा भरोसा ॥ १ ॥
अजून सूरज नाहीं मावळला
तोंच आलास चोर-पावलां
आणि ढळता पदर माझा धरला; जीव माझा घाबरला ॥ २ ॥
आभाळांत चमकूं दे चंद्राला। चंद्राला
सगळ्यांचा लागल्यावरी डोळा। डोळा
रिझवाया येइन तुला अलबेला। कृष्णा वचन देते तुला ॥ ३ ॥

[ गायक : जी. जे. वाटवे ]

★

मुंबईतील सुपर टॉकीज-मध्यें सतत शंभर आठवडे चाललेल्या **'रामराज्य'** ह्या बोल-



पटांतील अवीट गोड गाणीं **राजा बढे** ह्यांनीं केलेलीं आहेत एवढें सांगितलें म्हणजे पुरे !

# कोण ग उभें तुझ्या अंगणीं ?

हांसतेस अशी कां मनीं ? कोण ग उभें तुझ्या अंगणीं ?
कितीकदां वळुन पाहशी अन् पुन्हा नजर वळविशी
हा लपंडाव खेळसी
कोण ग उभें तुझ्या अंगणीं ?

अडविशी मुखावर हंसें
थरकांप हृदयीं होतसे
लागलें कुणाचें पिसें
कोण ग उभें तुझ्या अंगणीं ?

वळते न जीभ का मुकी
रक्तिमा पसरिते मुखीं
रेखिलें चित्र हें कुणी
कोण ग उभें तुझ्या अंगणीं ?

कोण ग तेच ना गडे
पण कशास हो एवढें
अगबाई मुळीं न आवडे
नव्हे का नांवही तें भाषणीं, कोण ग उभें तुझ्या अंगणीं ?

[ गायिका : लता मंगेशकर ]



'वारा फोफावला' ह्या अतिशय लोकप्रिय झालेल्या भावगीतसंग्रहाचे कवि बाबुराव गोखले ह्यांचें हें भावगीत त्यांनीं स्वतःच गाइलें आहे. हे उत्तम कवि-पद्यकार असून तुम्हाला आवडलेल्या पहिली मंगळागौर, चिमुकला संसार, जागा भाड्यानें देणें आहे इ. बोलपटांतील गाणीं ह्यांनीं केलेलीं आहेत. स्वभावही गाण्याप्रमाणेंच गोड, हौशी व मनमिळाऊ आहे.

# माहेरचा गांव

माहेरचा समोर गांव
सारंगा रं हांकार नाव ॥ ध्रु० ॥

नारळीच्या झावळांत माहेर माझं हांकेवरतं
येऊनि आई आगरांत ओवाळुन टाकील भात
तिच्या कुशीमंदि घेईन धांव ॥ १ ॥

गणगोत जमल् गांवचं कौतुक करतिल दोघांचं
मलाच म्हणातिल घे पोरी नांव ॥ २ ॥

कोजागिरी आज कोजागिरी
लंगर टाकूं माहेरच्या बंदरीं
समिंदराचा तुला सराव हांकार नाव ॥ ३ ॥

स्वररचना-कवि : बाबुराव गोखले ❀ गायक : बाबुराव गोखले



कवयित्री : सौ. संजीवनी मराठे

महाराष्ट्राची एकमेव फक्त गायिका-कवयित्री म्हणून सौ. संजीवनी मराठे ह्यांची आजवर ख्याती होती, पण आतां महाराष्ट्राच्या ह्या एकमेव लोकप्रिय प्रतिभासंपन्न कवयित्रीनें आपल्या निसर्गदत्त काव्य-सरितेचा प्रवाह बोलपटसृष्टीकडे वळवला असून त्यांत हेवा वाटण्यासारखें यश सम्पादिलें आहे. 'साखरपुडा' बोलपटांतील मधुर गाणीं सौ. संजीवनी मराठे बी. ए. ह्यांच्या प्रतिभेचीं प्रतीकें आहेत. ह्यांचे संसार, छाया, इ. काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत.

# आला स्वप्नांचा मधुमास !

आला स्वप्नांचा मधुमास, उमलवीत उरिंचा उल्हास !
निद्रेच्या भूमीवर फुलल्या, स्वप्नसुमनांच्या कळ्या कोंवळ्या
मूक मानीषा अंतरांतल्या, उधळती स्वैर सुवास....॥ १ ॥
ही नटवी प्रीतीची कलिका, घडीघडी दावी अनंत रूपा
धुंद करी अर्पुनी मनमधुपा, अद्भुत प्रणयविलास....॥ २ ॥
टवटवली मृदु शैशवसुमनें, लेवुनि तें मधुमंगल लेणें
अनिर्बंध मन गुंगत गाणें, भोगी छंद सुखांस....॥ ३ ॥
जागृतींत जें जें वांछियलें, तें तें या स्वप्नभूमांधिं रुजलें
रसरंगें अंतर्जग नटलें, नाचत जीवन रास....॥ ४ ॥

[ गायिका : कुमारी मालती पाण्डे ]



मीठभाकर, गांवगुंड, सुगी, कडू साखर इ. लोकप्रिय पुस्तकांचे लेखक श्री. **गजाननराव ठोकळ** ह्यांच्या बहुतेक कविता ग्रामीण जीवनाशीं परिचय करून देणाऱ्या आहेत. खेड्यांतील राहाणी खेड्यांतील भाषेंत वर्णन करून सांगणें हा त्यांच्या कवितेचा विशेष आहे. जन्म १९०९. हे पुण्याला रहातात.

# रेशमाची गांठ

[ गायक : **सुरेश मोहिले** ]

किती बघावी वाट ? अशी ग किती बघावी वाट ?
बाळपणाचा काळ अपुला
खेळीमेळिंत सरुनी गेला
लुटुपुटिचा संसार संपला
घरकुल मांडुन केला आपण भातुकलीचा थाट !
धनसंपत भोंवतीं घनंतर
किती भेटल्या मुलीहि नंतर
लालचावलें परी न अंतर
तुफान दरियावरी भडकलें तारू हें भन्नाट !
चैत्रपालवी गालांवरली
तिची न तांबुसता ओसरली
अजुन दिसे कांती लवथवली
एकलीच कां आयुष्याचा चढसी डोंगर-घाट ?
फुलासारखें ठेविन तुजला
फोड जणूं तळहातावरला
सुरुवात करूं संसाराला
तुझ्या नि माझ्या जीवाची चल बांधूं रेशिमगांठ !



निर्माते, नट आणि नाटककार व कवि अन् गायक अशा अनेक मार्गांनीं प्रसिद्ध असलेले नामदेव व्हटकर, बी. ए. (ऑनर्स) हे हल्लीं नागपूर नभोवाणी केंद्रावर काम पहातात. त्यांचें लिखाण खेडूत जीवनावर आधारलेलें असून त्यांचे अनेक संवाद व गाणीं ध्वनिमुद्रित झालेलीं आहेत.

# दुपारची चोरी

भर दुपारच्या ग प्रहरीं । मंडळी सारी शेजारी
अशी कशी घरांत झाली बाई चोरी ॥ ध्रु० ॥

मी घरांत होते बसलें । मज अंगणांत तें दिसलें
मी बघतां बघतां फसलें । अन् चोरा पाहून हंसलें
मंडळी असुन शेजारी ॥ अशी ० ॥ १ ॥

किती चोराची नवलाई । दादा चोरा सामील होई
दोघे हातांत घालुनी हात । बाबा पुढुनी आले आंत
बैसला चोर बाहेरी ॥ अशी ० ॥ २ ॥

मधु हास्य लावुनी चावी । तिजोरी दुरुन कशी उघडावी
प्रीतिचा चोर कंदील । नेलें चोरुन त्यानें माझें 'दील'
लुटली ऐपत माझी सारी ॥ अशी ० ॥ ३ ॥

जरी ऐपत माझी नेली । विसरला इथेंच तो अपुली
जरी येईल मागायासी । तरी देईन नच मी त्यासी
डांबीन इथे चौप्रहरी । करावी कशास असली चोरी ॥ ४ ॥

[ गायक : गोविंद कुरवाळीकर ]

★

## शेजारच्या घरांत

शेजारच्या घरांत आलास पाहुणा तूं
माझ्या घराकडे रे तवदृष्टि कां परंतू

जात्यावरी पहांटे, मी बोलतांच गीत
घेऊनि करीं पावा, करितोस गोड सांथ
मी घाली सडा तेव्हां, ओटीवरी तूं येसी
उडतांच पदर माझा, टक लावुनी पहासी

सप्ताह एक गेला, कळलें मुळींच नाहीं
मन मोकळें कराया, मिळली न संधि बाई

जातां धुण्या नदीला करितोस पाठलाग
आंघोळीच्या निमित्तें, मम भिजवितोस अंग
दिसलास आज नाहीं, गेलास काय नकळे
बघण्यास आज कैसे मिळतील गोड चाळे ?

आहे मला भरोसा, घेशील पुन्हा धांव
अन् प्रेम-रज्जुनी रे, एकत्र गुंफुं जीव

कवि : वामनराव निपुणगे ☆ गायक : गोविंद कुरवाळीकर

★

# पाटलाची पोर

अग पाटलाच्या पोरी जरा जपून जपून
बिगी बिगी कुठं ग जाशी शेतामधुन ॥ ध्रु० ॥

आलं ऊन ग भंवती फुलुनी
नग जाऊं तूं ग फुलराणी
काटं ग बोचतील बाई, नाजूक तुझ्या पायीं
तुझं चंद्रावाणी मुख जाईल सुकून ॥ १ ॥

तुझ्या गालाची खुलली लाली ग
जनूं डाळींब फुटलंया गालीं,
लई घुटमळतय् माझ्या मनांत
चल जाऊं दूर मळ्यांत
संग संगच रानोमाळ येवूं फिरून ॥ २ ॥

रानीं वाऱ्याचीं ऐकून गाणीं ग
नाचे झऱ्याचं झुळझुळ पाणी
राईत कुहुकुहु बाई कोकिळा काशि गाई
तसं पिर्तीचं गान गाऊं दोघं मिळून ॥ ३ ॥

कवि : श्रीनिवास खारकर ~~~~ गायक : गोविंद कुरवाळीकर

# अंधारांतील भेट

मध्यरात्रिला पडे तिच्या दारावरती थाप
नवथर जीवाचा झाला भीतीनें थरकाप
धडधडत्या वक्षावरती ठेऊनि उजवा हात
कानोसा घेऊं लागे तशीच अंधारांत

परिचित आली तोंच कानावरती शीळ
सांगे कीं या राधेचा दारीं उभा घननीळ
भीतीचा लवलेश नुरे, त्या सुंदर नयनांत
भीतीवरती प्रीती ही, अशीच करिते मात

माथ्यावरती सांवरुनी पदर घेतला नीट
दार उघडुनी बाहेरी उभी ठाकली धीट
परिचित बाहूंचा पडला, विळखा तों देहास
आणि मिळाले उभयांचे श्वासामध्यें श्वास

आलिंगन तें शिथिल परी, झालें दुज्या क्षणास
भंवतींच्या जगताची हो, जाणीव धुंद मनास
अंधारांतच गेला तो, शूर तिला सरदार
खिन्न मनानें परत फिरे ही चंद्राची कोर

कळ दुःखाची तीव्र उठे, तिच्या काळजांतून
गालावरुनी ओघळलीं आणि आंसवें ऊन
मंद समीरण भंवतालीं, गाई करुणा-गीत
अन्य कुणा नच कळली ती अंधारांतील भेट

कवयित्री : शांता शेळके ~~~~~ गायक : जी. एन्. जोशी

# नांव तिकडचं  घेऊं ग कसं बाई!

नांव तिकडचं घेऊं कसं ग बाई । नांव० ॥
रूपगुणाला अचुक जुळेसं बाई ॥ ध्रु० ॥

नयनीं जयांच्या रात्र चांदणी
मोत्यांची वदनांत मांडणी
वचनिं गोडशी चतुर लावणी
लहान-थोरां लावि पिसें ग बाई ॥ १ ॥

भाग्यवंत सखि हात इकडचा
शिवतां मधु रस होई जलाचा
मातीला ये कस सोन्याचा
स्पर्शे ज्यांच्या स्वर्ग दिसे ग बाई ॥ २ ॥

हृदय जयांचें पुण्यशील अति
इंद्रनीळ गगनाची कांती
कुळशीलाची पावन कीर्ती
गंगेचें जणुं मूळचसें ग बाई ॥ ३ ॥

दसलाखांचें नांव तयांचें
गांव गांव सखि गाजायाचें
सौख्य मलाही तें घ्यायाचें
परि सखे सुचेना घेऊं कसं ग बाई ॥ ४ ॥

कवि : बा. भ. बोरकर ◈ ◈ ◈ गायिका : कांचनमाला बढे

# अंतरींच्या अपुऱ्या आशा

अंतरींच्या अपुऱ्या आशा
आकारून कधीं येतिल का रे, येतील का ?
सांग माझ्या मानसींची
भावफुलें फुलतील का ?

प्रकाश सरला जीवनाचा
दिव्य किरण तव प्रीतीचा
मार्ग माझ्या जीवनाचा
कधीं सख्या, उजळेल का ?

काय केली जादू न कळे
वेड जिवाला तुझें लागलें
भिन्न अपुलीं दोन हृदयें
एकरूप कधीं होतिल का ?

कवि : मा. ग. पातकर ~~~~~~~~~ गायिका : भानुमती कंस



# तुज स्वप्नीं पाहिलें रे

[ कवि : दत्ता डावजेकर ]

तुज स्वप्नीं पाहिलें रे गोपाला !
जमल्या ललना चतुरा, मोदें स्वागत करण्याला,
आळविती कुणी सुरस रागिणी, कोमल मंजुळ वाणी,
तव श्रांत वदन शमवाया, नंदकिशोरा हंसवाया,
झुळझुळ वायुहि आला, तुज स्वप्नीं पाहिलें ॥ १ ॥

थांबति विहंगहि नभिं या, पसरुनि शीतल छाया,
दिपतिल नयन तुझे रे म्हणुनी, रविवरी मेघमालिका जमुनी,
अंजिरी पडदा महिवरी धरिला, तुज स्वप्नीं पाहिलें ॥ २ ॥



[ गायिका : लता मंगेशकर ]

★

# सखा नाहीं आला का घराकडे

कां उदास बघसी चंद्राकडे । सखा नाहीं आला का घराकडे ॥ ध्रु०॥

चांदण्यासवें चंद्र पाहुनी
हुरहुर लागे काय तव मनीं
भिरभिर फिरविशी नजर चहुंकडे ॥ १ ॥

डोळ्यामधुनी अश्रु चालले
वाटे प्रीतिचे धागे तुटले
गमत काय पतिभेट नच घडे ॥ २ ॥

तुझ्या मनीं नवतिच्या भावना
कशा फुलोनी आल्या बघ ना
म्हणुनि चैन ना तुला पडे ॥ ३ ॥



कवि : जी. के. दातार ★ गायिका : सौ. लीला सरदेसाई

# तुझं–माझं प्रेम जुळलं

तुझं माझं प्रेम जुळलं। कोजागिरीला नातं जडलं ॥ ध्रु० ॥

संध्याकाळीं ओळख नव्हती
मध्यरात्रिला फुलली प्रीती
फक्त चंद्रानें पाहिलं ॥ १ ॥

मंदिराच्या गाभाऱ्यांत
प्रीत-निरांजन तेवत होतं
एकमेकां ओवाळिलं ॥ २ ॥

स्वैर विहरतां रात्र संपली
प्रीती-गीतें तरि ना सरली
चंद्र लाजला, काळं केलं ॥ ३ ॥



गायिका : शांता आपटे ❁ ❁ ❁ कवि : बाबुराव गोखले

महाराष्ट्राचे लाडके गायक



श्री. गोविन्द कुरवाळीकर




नका गडे माझ्याकडे पुन्हा पुन्हा पाहूं !
लाजरीच्या रोपटीला दृष्ट नका लावूं ॥ ध्रु० ॥
घोटाळते पायामाजी तुरुतुरु चाल
आडतात ओंठावरी मनांतले बोल
नका बाई माझ्यामागें नदीवरी येऊं
लाजरीच्या रोपटीला० ॥ १ ॥

पाहील ना कुणीतरी सोडा माझी वाट
मुलुखाचे द्वाड तुम्ही निलाजरे धीट
इतुक्यावरी हांसुनियां वेड नका लावूं
लाजरीच्या रोपटीला० ॥ २ ॥

माथ्यावरी वैशाखाचें रणरणे ऊन
छंदिफंदी डोळीयांचे त्यांत आगवाण
बावरल्या हरिणीची पाठ नका घेऊं
लाजरीच्या रोपटीला० ॥ ३ ॥

कवि : ग. दि. माडगूळकर ★ गायक : गोविंद कुरवाळीकर

★

# रानांत सांग कानांत आपुलें नातें

रानांत सांग कानांत आपुलें नातें
मी भल्या पहांटे येतें
पाण्यांत निळ्या गाण्यांत भावना हलते
हळुहळू कमलिनी फुलते ॥ ध्रु० ॥

आभाळ, जगाचे भाळ, मळवटी नटते
उगवतीस हासूं फुटते
ज्या क्षणीं विरही पक्षिणी सख्याला मिळते
मी भल्या पहांटे येतें ॥ १ ॥

व. व. न. रा. व.



ना. व. डी. क. र

# उंबरठ्यावर माप ठेविलें

उंबरठ्यावर माप ठेविलें, मी पायानें उलथुनि आल्यें।
आल्यें तुझिया घरीं, कराया तुझीच रे चाकरी ॥ ध्रु० ॥

माहेराची माया तोडुनि
इकडे आल्यें सख्या, धांवुनि
वृत्ति होई बावरी, आल्यें तुझिया घरीं, कराया० ॥ १ ॥

फुलांसारखी घरीं वाढल्यें
आईनें ओंजळींत धरिलें
अश्रू येतां दुरी, आल्यें तुझिया घरीं, कराया० ॥ २ ॥

तुझे चरणरज लावीन भाळीं
तुझीच गाईन मी भूपाळी
हात तुझे गळसरीं, आल्यें तुझिया घरीं, कराया० ॥ ३ ॥



गायिका : कु. सरोज वेलिंगकर    कवि : मनमोहन नातू

# गळ्याची शपथ

गळ्याची शपथ तुला जिवलगा ! तुला जिवलगा !
मुखीं सुधेचा कलश लाविला
एकहि नाहीं घोट घेतला
नकोस घेऊं असा हिसकुनी । नकोस देऊं दगा !

वेल प्रीतिची तूंच लाविली
सजली फुटली, फुलूं लागली
नको चुरगळूं असा कठोरा, तूंच राखिली निगा !

तहान हरली, भूकही हरली
एकच आशा मनांत उरली
पुन्हा बोल ती नाजुक भाषा, तूंच जिवाचा सगा !



कवि : ग. ल. ठोकळ ~~~~~~ गायिका : कु. माणिक दादरकर

हरभरा जिथें ये भरा शाळु सळसळते
वाऱ्यांत शीळ भिरभिरते
त्या तिथं तुला सांगतें, हरलि मी देतें
बोलावुन तुजसी घेतें ॥ २ ॥

आनंद पुढें पाणंद सभोंती शेतें
पूर्वेस बिंब तों फुटतें ॥ ३ ॥

कवि : ग. दि. माडगूळकर ~~~~ गायक : बबनराव नावडीकर

★

## घनश्याम नयनीं आला

घनश्याम नयनीं आला
सखे मी काजळ घालूं कशाला ? ॥ ध्रु० ॥
रोमांचानें नटली काया,
हिरे माणकें कशास वाया,
कशास मोहनमाला ॥ १ ॥
कटीभोंवतीं कर कृष्णाचे,
लेणें ल्यालें आभासाचें,
कशास मग मेखला ? ॥ २ ॥
कृष्णसख्याची मादक मुरली,
रात्रंदिन या कानीं भरली,
शृंगार सर्व झाला ! ॥ ३ ॥

कवि : ग. दि. माडगूळकर ~~~~ गायिका : सरस्वती राणे




चल रानांत सजणा, आंबेवनांत जाऊं या दूर ॥ ध्रु० ॥

राया गुपीत आपुलं फुटलं
जग भोंतीचं बोलत सुटलं
उठे काहूर लागे हुरहूर, आंबेवनांत जाऊं या दूर ॥ १ ॥

चांदण्याची पांघरुन शाल
लुटूं आनंद धुंद खुशाल
बघूं नौतीचा दुनियेचा नूर, आंबेवनांत जाऊं या दूर ॥ २ ॥

नको संकोच भीति मनांत
सख्या, जिवाची करूं चांदरात
दाटे प्रीतीचा रंगरसपूर, आंबेवनांत जाऊं या दूर ॥ ३ ॥

जिवाजिवाचीं प्रेमळ गाणीं
बसूं गात पाखरांवाणी
धरूं प्रीतीचा एक ताल-सूर, आंबेवनांत जाऊं या दूर ॥ ४ ॥

कवि : स. अ. शुक्ल गायक : जी. एन्. जोशी

★



# घरधनी गेला दर्यापार

गेला दर्यापार । घरधनी गेला दर्यापार ॥ ध्रु० ॥

पुरती ओळख नव्हती झाली
अंगाची ना हळद निघाली
अजुनी नाहीं देवक उठलं
नाहीं उतरला गौरीहार ॥ १ ॥

पलटण घेउनी बोट चालली
परतुनी राया कधीं येणार
संसाराचीं स्वप्नें माझीं
अशींच का रे विरघळणार ॥ २ ॥

डोळ्यामधुनी गळती धारा
धीरही सुटला पार
घरट्याभवतीं मूक पाखरूं
असंच कुठवर भिरभिरणार ॥ ३ ॥

कवि : ग. दि. माडगूळकर ★ गायक : जी. जे. वाटवे







कसा ग गडे झाला? कुणी ग बाई केला?
राधे, तुझा सैल अंबाडा!
पृथ्वीच्या पेल्यांत गाळिलीं
रजनीच्या बागेतील द्राक्षें
भुलवुनी तुजला बनांत गेली
रसरसलेली रात्र रंगली
वाजवितां बांसरी, कच-पाशांचा नाग उलगडी फडा ॥ १ ॥

पहिल्या चंचल भेटीमधली, बाल्याचीं कवुतरें पळालीं
वेणी तिपेडी कुरळी मृदुला, सुटली घालित गंध-सडा ॥ २ ॥

भ्रमर रंगी हा श्याम सांपडे, नीलकमल कचपाशीं तव गडे
अरुणोदय होतांच उलगडे, पाकळी पाकळी होई मोकळी
या कोड्याचा झाला उलगडा ॥ ३ ॥

कवि : मनमोहन नातू ~~~ गायक : जी. जे. वाटवे

★




आरसा फोडलांत तुम्ही ! आतां वेणी घाला माझी ॥ ध्रु० ॥
माहेराकडुनी आलेला
सोन्याच्या चौकटींतला
छान बिलोरी ! कां केली त्यावर इतराजी ? ॥ १ ॥

द्या हा कंगवा हातीं
मी पुढ्यांत बसते अशी
पाडा भांग तिरपा
बाजुला फुगे अन् फुलवा ! कृष्णाचा कित्ता गिरवा बाई !॥ २ ॥

नका करूं खट्याळपणा
केस ओढूं नका
काजळ घालितां डोळा ! शेपट्याला टाय बांधा
अगवळाऐवजीं ॥ ३ ॥

कवि : मनमोहन नातू ◇ ◇ ◇ गायक : दत्ता वाळवेकर

★

# निरांजन पडलें



नीरांजन पडलें तबकांत
बाळ तव गेला समरांत ॥ धृ० ॥

क्षणाआधि तर तेवत होती
पूजेमधली प्रशांत ज्योती
दृष्ट कुणाची लागून का ती । विझली निमिषांत ॥ १ ॥

ओवाळुनही झाली नव्हती
तोंच उधळली मंगल आरती
कां पडली बाळाची आहुति । संगर-यज्ञांत ॥ २ ॥

रागरागिणी आळवुन झाली
आयुष्याची कविता संपली
दुर्दैवानें माता बसली । भैरवी आळवीत ॥ ३ ॥

परक्यांना करण्यास्तव तर्पण
फूल पोटीचें केलें अर्पण
निर्माल्याला तुडवुं नका पण । सोडा गंगेत ॥ ४ ॥

आतां मज द्या शव आणुनी
झाकिन तें मी ऊर फाडुनी
भडाग्नि शोकानलें देउनी । निजेन सरणांत ॥ ५ ॥

स्वररचना-कवि : बाबुराव गोखले ★ गायक : जी. जे. वाटवे

# मैत्रिणींनों सांगूं नका नांव घ्यायला !



मैत्रिणींनों सांगूं नका नांव घ्यायला ॥ धृ० ॥
नका विचारूं स्वारी कशी ? दिसे कशी, आणि हांसे कशी ?
कसं पाडलं मला फशीं ? कशी जाहलें राजीखुशी ?
नजीक येतां मुहूर्तवेळा, मैत्रिणींनों० ॥ १ ॥

नका विचारूं गमती जमती ? काय बोललों पहिल्या भेटीं
कसें रंगलें स्वप्न पहाटीं ? कशी रंगली लाली ओठीं ?
कसा जाहला जीव खुळा, मैत्रिणींनों० ॥ २ ॥

अर्थ उलगडे समरसतेचा ! सुटे उखाणा संसाराचा
छंद लागला मजला त्यांचा ! धुंद बने बुल्बूल् जिवाचा
घरीं यायची झाली वेळा, मैत्रिणींनों० ॥ ३ ॥

कवि : मनमोहन नातू ★ ★ गायिका : सरोज वेलिंगकर

★



# सांगूं नको !

प्रीत तुझी माझी कुणाला सांगूं नको साजणी
पुन्हा पुन्हा हिणवुनी तुला ग हसतिल ना मैत्रिणी।
सवें प्रीतिची ज्योती उजळूं
सवेंच प्रीती-लहरी उधळूं
प्रसन्नतेनें निवांत खेळूं
प्रीतीच्या अंगणीं

चंदेरी रात्रीं जाऊनिया
कांठावरुनी पाहूं दरिया
सोबत देईल येउनि उद्या
शुक्राची चांदणी

अपुल्या प्रीतीची ग ग्वाही
फिरवुं नको इतुक्यांत कुठेंही
उघडपणीं मम गुणगौरवही
करूं नको साजणी

कवि : बाबुराव गोखले — गायक : जी. जे. वाटवे

★

# कमरेला पदर खोंचुन



कमरेला पदर खोंचुन।
ये मोटवणावर धांवुन ॥ ध्रु० ॥
जिवाभाची तूं ग मैतरिण
तुझ्याविना सुनी ही मोट्वण
करूं उभ्या पिकाची राखण
गरगरां फिरवुनी गोफण
तुझ्या उभार देहाची ठेवण
तुडविते जिवाचं कुंपण
मार्गिसरात लावुन लगीन
माझ्या मळ्याची होशिल माल्किण

स्वररचना—कवि : बाबुराव गोखले ◇ गायक : बाबुराव गोखले



# आली रे आली ! आंबेवाली !



आली रे आली
अरे आली !

आली रसाळ
आंबेवाली !

तारुण्याची वेल जणूं ही
फलभारें वांकली !

आंब्याहुनही मोहक कांती, गालीं रसरसली
आंब्यामधल्या गाभ्याची, भाळीं शिरीं कां रेखिली
धुतली बाठी दिसे हनुवटीं, किंचित् पुढती वळली
चोंच राघुची जणूं नासिका, आंब्यावर टपली
फळांहुनीही हिच्या रुपाची, भूल मला पडली

कवि : ग. दि. माडगूळकर ~~~~ गायक : गोविंद कुरवाळीकर

★



# फांद्यावरी बांधिले ग

फांद्यावरी बांधिले ग, मुलींनीं हिंदोले ।
पंचमीचा सण आला, डोळे माझे आले ॥ धृ० ॥

श्रावणाच्या शिरव्यांनीं, आनंदली धराराणी ।
माझे पण प्राणनाथ, घरीं नाहीं आले ॥ १ ॥

जळभरें पानोपानीं, संतोषली वनराणी ।
खळखळा वाहतात, धुंद नदीनाले ॥ २ ॥

पागोळ्या गळतात
बुडबुडे पळतात
भिजलेल्या चिमणीचे, पंख धन्य झाले ॥ ३ ॥

आरशांत माझी मला, पाहूं बाई किती वेळां ।
वळचणींची पाल कांहीं भलेंबुरें बोले ॥ ४ ॥

कवि : ग. दि. माडगूळकर ★ गायक : जी. जे. वाटवे






वारा फोफावला दरिया उफाळला
माझं ग तारू कसं हांकारू
सजणे समिंदरांत !

लाटेवर लाट पाठोपाठ
थयथय दरिया नाचे कांठोकांठ
तुफानाची खुणगांठ !

वाऱ्यानं शीड करी फडाफडा
छातींत होई धडाधडा
माझी काय् छाती नाय् वल्हवायला !

हें बघ कललं उजवीकडं
क्षणांत झुकऽलं डावीकडं
फेंसाळ पाणी होडींत आलं थोडं थोडं !

कवि : बाबुराव गोखले * * * गायक : जी. जे. वाटवे






# गोकुळींचा राजा

गोकुळींचा राजा माझा, गोकुळींचा राजा ॥ ध्रु० ॥
देवकीनंदन श्याम सुलोचन,
गोपगड्यांसह खेळे हांसुन
लेवुन पानफुलांच्या साजा ॥ १ ॥

वाम बाहुवर कपोल डावा,
अधरिं आडवा धरला पांवा
मोहन कुंजविहारी माझा ॥ २ ॥

यमुनातीरीं उभ्या गौळणी,
रूप घेती तें नयनीं भरुनी
सोडुनि जलभरणाच्या काजा ॥३॥

कवि : ग. दि. माडगूळकर ★ गायिका : माणिक दादरकर






सखये प्रेमपत्र पहिलें ॥ ध्रु० ॥
मखमाली गालावरी लाजत
अधरांनीं लिहिलें ॥ १ ॥

अंगअंगावरी रंग पसरला,
मणिबंधीं फिरफिरुनी पुसला,
उपाय माझा पुरता फसला,
यौवन रसरसलें ॥ २ ॥

वाचायातें, नयनें मिटलीं,
तरिही लाजरी हौस न फिटली
जाति न लिखितें पुसतां पुसलीं,
अंतरंग कळलें ॥ ३ ॥

कवि : राजा बढे — गायिका : सुमन माटे

★

## कुणि आलं कुणि आलं

कुणि आलं कुणि आलं। जिवाला वेड लावुन गेलं ॥ध्रु०॥
नाहीं ठावूक नांव। नाहीं माहीत गांव
मला पाहून उगिचच हंसलं ॥ १ ॥
होते आंबेवनांत। गीत मजेत गात
तोंच पाण्यांत पाऊल वाजलं ॥ २ ॥
गोड सकाळचा पार। वारं झुळझुळ गार
फुल उंबराचं अवचित फुललं ॥ ३ ॥
गाणं राहयलं गळ्यांत। दृष्टि फिरली मळ्यांत
टोक फेट्याचं पिकांत लपलं ॥ ४ ॥
त्याच्या नजरेची धार। भेदी जिवास पार
त्यानं चोरून काळिज नेलं ॥ ५ ॥

कवि : ग. दि. माडगूळकर ☼ ☼ गायक : बबनराव नावडीकर

## माझ्याजवळी बसा

हंसा एकदां पुढें दहादां, दासीवर या रुसा
आज येउनी परंतु थोडे, माझ्याजवळी बसा ॥ धृ० ॥
द्या वचन एकदां, ओळख पटली म्हणून
मऊ हात एकदां, फिरवा केंसावरून
मज आलिंगन द्या, प्रीतीनें गहिंवरून
त्या भेटीचा जन्मभरी, मी उरीं बाळगीन ठसा ॥ १ ॥

मज कळतें तुम्ही परकीचे जाहला
तो बाळपणाचा काळ आतां संपला
कळतें तरीहि वळत नाहीं ना मला
पुन्हा न असली घालायाची, गळ तुजला राजसा ॥ २ ॥

कवि : ग. दि. माडगूळकर ~~~~ गायिका : कुमुदिनी पेडणेकर



## श्रावणराजा आला !

कशि बाई दुनिया डोले फुले !
साज तिला हा नवा हिरवा ग खुले !
श्रावणराजा आला
नव बिजलीचें लेणें ल्याला
पाहुन मन हें भुलें, हुरळलें !
दुनिया डोले, फुले ! १

नाचत छुमछुम गाऊं सुस्वर
झिमझिम रिमझिम ताल सुरावर
घेऊं झुल्यावर झोले
चला ग बाई !
दुनिया डोले, फुले ! २

कवि : स. अ. शुक्ल * * * गायिका : सौ. मीनाक्षी

## छेडुनीयां हृदयवीणा

छेडुनीयां हृदयवीणा
जादुगारा, दूर जाशी
दान माझें द्यायचें तें
राहिलें माझ्याच पाशीं ! ध्रु०

साद जीवा घातली तूं;
दाद नाहीं मज परन्तू
स्वप्न सारें भंगलें तें;
जागृतीं वैरीण खाशी ! १

हांक हृदयाची तुझी ती
मज उशीरां उमजली
विकल अन्तर हें निरन्तर
गुन्तलें तव मोहपाशीं ! २

कुढतसे मनिं मी अभागी,
दूर लोटुनी सौख्यराशी
अजुन तूं परतून येशिल;
आस ही बिलगे उराशीं !
कां उदारा, दूर जाशी ? ३

कवि : स. स. शुक्ल — गायिका : सौ. कांचनमाला बढे

## लपंडाव मांडला

लपंडाव मांडला
आम्ही बाई लपंडाव मांडला !
प्रीतिचा आमुचा
खेळ कसा रंगला ! ध्रु०

कां हंसतां मिचकावुन डोळे ?
आम्ही नव्हे हो साधे भोळे !
चान्दण्यांनों ! तारकांनों !
हुडकुन काढा आम्हांला
आम्ही बाई लपंडाव मांडला ! १

लपला राया चन्द्रामागें
मी लपलें रायाच्यामागें
लपाछपीची भूल-भुलावण
भुलवी जीवाला !
आम्ही बाई लपंडाव मांडला ! २

चन्द्र कुणासही सांगणार नाहीं
कांहीं पुशिलें तरी
शोधशोधुनी, उगाच दमुनी
चान्दण्यांनों, कोंसळाल भूवरी !
आम्ही बाई लपंडाव मांडला ! ३



कवि : स. अ. शुक्ल ★ ★ गायक : जे. एल्. रानडे

# तुझ्या दारिं आलें होते


तुझ्या दारिं आलें होते भिकारीण राया !
साद घातली आशेनें जीव तोडुनीयां !

मूक हांक ह्या हृदयाची ऐकलीस नाहीं
दाविलीस बेपर्वाई दार झांकुनीयां !

अपेक्षिलें तुजपासुनि तें मिळालेंच नाहीं
राहिलें न माझें तेंही आपुलें म्हणाया !

दूर दूर गेल्यावर मी, माझा सूर ओळखोनी
साथ मला द्यायाला कां धांवलास वाया ?

जीवनास जोगिण मुकली दीन ही तृषार्ता
चालली अतां जगताची सुखें आग प्याया !



कवि : स. ज. शुक्ल ~~~~~~ गायक : जी. एन्. जोशी

## कवि ] भावगीत ऐकिलें [ बाबुराव गोखले

भावगीत ऐकिलें जें तुवां ऽगायिलें ।
कां ? तुझ्या मनांतलें द्वंद्व त्यांत सांठलें ॥ १ ॥

शब्द अर्थ सुचविती सूर दर्द दाविती
भाव मुळिं न झाकिती
कां ? तुझ्या स्मृतींतलें भग्न-स्वप्न रेखिलें ॥ २ ॥

अस्ताईंस शांतता अंतऱ्यांत आर्तता
मिळवणीत खिन्नता
समेवरी कशामुळें ? गीत तें पुन्हा खुले ॥ ३ ॥

गीत-रागरागिणी तुझीच ऐकतांक्षणीं
भासलीस विरहिणी
एकलेपणांतलें विरहगीत वाटलें ॥ ४ ॥

मजसि आज भासलें समविरही भेटले
ना कळे कशामुळें
मन्मनास जिंकिलें जरि तुला न पाहिलें ॥ ५ ॥

गा
य
क



वा
ट
वे

# माझ्या कानांत नको कांहीं सांगूं रे

माझ्या कानांत नको कांहीं सांगूं रे
माझ्या मनांत नको कांहीं भरवूं रे

तूं तर भ्रमरा फुलाफुलांचा चोर, मी नाहीं अजाणती पोर
पुरी जाणूनि बसले चाळे सारे, माझ्या मनांत नको कांहीं भरवूं रे १

कधीं जातोस झिडकारूनी, पुन्हां येऊनी चोराच्या पाऊली
कशी हळूंच गाशी गोड गाणीं, तव गाण्याचा भाव मज कळला रे २

मज उभी बघूनी दारीं, सदनाशीं उभी सवंगड्यांत आपुली स्वारी
मज कळले सगळे हे नखरे, माझ्या मनांत नको कांहीं भरवूं रे ३

कवि : दत्ता डावजेकर ~~~~~~~~~~ गायिका : सौ. आशा भोंसले

★

## निलांगणीं या हांसत बघ आला!

निलांगणीं या हांसत बघ आला, चन्द्रमा
शोभवी तारका सर्वे मण्डळाला।
आला आला पुनवेला ॥ ध्रृ० ॥

चंदेरी सागरीं या लाटा
दुडुदुडु धांवुनी दाविती वाटा
साजणा, साजणा, साजणा, पहा ना ॥ १ ॥

विहार रे करूं या, भुरुभुरु अपुली नांव वल्हवुयां
हांसुया, नाचुंया, गाऊंया, फुलवाया प्रीति फुलोऱ्याला,
आला, आला, पुनवेला ॥ २ ॥

कवि : प्रभाकर जोशी ★ गायिका : सौ. इंदुमती चौबळ



REFBK-0007253
REFBK-0007253

विलापिकेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून टीकाकार या गीताचा निर्देश करतात. '१९४८ सालचें उत्कृष्ट गीत' म्हणून मा. दिनानाथ पारितोषिक या भावगीताला मिळालेलें आहे. लहानापासून थोरापर्यंत, खेड्यापासून शहरापर्यंत, घराघरांत — झोपडीझोपडींत — ही "बापूजींची प्राणज्योती" तेवत आहे.

कवि : **मनमोहन** : गायक : **वाटवे**

## ापूजींची प्राणज्योती !

ती पहा, ती पहा, बापूजींची प्राण ज्योती !
तारकांची सुमन माला देव त्यांना वाहती ॥ ती पहा ॥
झुंजला राजा-सवें हा
रंगला रंका-सवें हा
पेटतां देहहि आतां दिव्यता दावूनी जाती ॥ ती पहा ॥
चंदनाचें खोड लाजे
हा झिजे त्याहूनहि
आज कोटी लोचनींच्या अश्रुमाला सांडताती ॥ ती पहा ॥
पृथ्वीच्या अक्षांशि लाली
पृथ्वीच्या रेखांशि लाली
चार गोळ्या ज्या उडाल्या दशदिशांना कांपताती ॥ ती पहा ॥
नांव ज्यांचें ऐकुनीयां
थरकली सिंहासनें
ना जरी तलवार हातीं हा अहिंसेचा पुजारी ॥ ती पहा ॥
सत्य मानी देव आणि
झुंजला खोट्यासवें हा
मृत्युच्या अंतीम वेळीं नाम रामाचें मुखीं ॥ ती पहा ॥
सिंधु गंगा आणि यमुना
धन्य झाली अस्थिनी
राख तूझी भारताच्या तिलक झाली रे ललाटीं ॥ ती पहा

৭০৪৩৬

अल्पावधींतच अत्यंत लोकप्रिय झालेलें

स्त्रियांचें आवडतें अभिनव मराठी मासिक

अंक : ६ आणे ] **वनिता - विश्व** [ वा. वर्गणी रु. ४

अंक खरेदी करा किंवा वर्गणीदार व्हा.

वृत्तपत्रविक्रेत्यांकडे किंवा बुकस्टॉलमध्यें अंकाची मागणी करा.

तेथें न मिळाल्यास आमचे कचेरींतून खरेदी करा.

**हिंद प्रिंटिंग वर्क्स**, गिरगांव, मुंबई ४

नमुना अंकाकरितां दोन आण्याची पोष्टाचीं तिकीटें पाठवा.

# सेन्ट्रल वॉच, रेडिओ ॲन्ड
# * ग्रामोफोन हाऊस *

आमच्याकडे या पुस्तकांत छापलेल्या गाण्याच्या व इतर सर्व रेकार्डस् मिळतील. त्याचप्रमाणें रेकार्ड बॉक्सेस्, ग्रामोफोन व पिकूअप पिन्स आणि संगीताचें सर्व सामान योग्य भावानें विकत मिळेल व रिपेअर करून दिलें जाईल.

मालक : **कुळकर्णी**

**मॅजेस्टिक सिनेमासमोर** : गोखले बिल्डिंग : मुंबई नं. ४

मुखपृष्ठ छपाई : हिंद प्रिंटिंग वर्क्स : मुंबई ४